# उच्च न्यायालय, मुंबई
# शिपाई/हमाल पदाकरीता निवड प्रक्रिया २०२३

**वाचा :—** १) मुंबई उच्च न्यायालय, मुख्यालय, मुंबई यांच्या आस्थापनेवरील "शिपाई/हमाल" पदाची जाहिरात दिनांक २१/०३/२०२३.

२) उच्च न्यायालय, मुंबई यांची नोटिस दिनांक २०/०९/२०२३.

३) उच्च न्यायालय, मुंबई यांची नोटिस दिनांक १२/०१/२०२४.

४) उच्च न्यायालय, मुंबईच्या अधिकृत संकेतस्थळावर "शिपाई/हमाल" पदाच्या लेखी परिक्षेस पात्र ३८८८ उमेदवारांची प्रसिद्ध करण्यात आलेली यादी दिनांक २१/०३/२०२४.

## सूचना

उच्च न्यायालय, मुंबईच्या अधिकृत संकेतस्थळावर दिनांक २८/०३/२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या यादीनुसार, उच्च न्यायालय, मुंबई, मुख्यालय मुंबईच्या आस्थापनेवरील "शिपाई/हमाल" पदाच्या लेखी परीक्षेस पात्र झालेल्या **३८८८ उमेदवारांना** असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी शिपाई/हमाल पदाची जाहिरात दिनांक २१/०३/२०२३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे दिनांक **०५/०४/२०२४ ते १५/०४/२०२४** या कालावधीत परीक्षा फी **₹ १२५/—** 'SBI Collect' (स्टेट बॅक ऑफ इंडिया) मार्फत **फक्त ऑनलाईन पध्दतीने** जमा करावी. **"SBI Collect" लिंक ०५/०४/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता उघडेल आणि १५/०४/२०२४ रोजी संध्याकाळी ५.०० वाजता बंद होईल**, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

तसेच इतर कोणत्याही मार्गाने शुल्क स्विकारले जाणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. नमूद केलेल्या कालावधीत शुल्क न भरल्यास उमेदवारास कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही व त्याची/तिची उमेदवारी सदर पदाकरीता रद्द ठरविण्यात येईल.

**सही/—**

**दिनांक : ०४ एप्रिल, २०२४** **प्रबंधक (कार्मिक)**